
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २४४६

REFBK-0023484
REFBK-0023484

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मुंबई शाखा (स्थळ प्रत)



# गीतगोपाल

ग. दि. माडगूळकर

REFBK-0023484
REFBK-0023484

© ग. दि. माडगूळकर

□ □

आवृत्ति दुसरी
जून १९७०

□ □

मूल्य ४ रुपये

□ □

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणें ३०

□ □

प्रकाशक :
ज. श्री. टिळक
केसरी प्रकाशन
५६८ नारायण पेठ
पुणें ३०

□ □





## अर्पण

उजवा तळहात टेकवीत
डाव्या गुडघ्याने रांगतो
—अशा बाळकृष्णरूपास

श्रीकृष्णचरित्रांतील
कृष्णजन्मापासून मथुरागमनापर्यंतचा कथाभाग
या पस्तीस गीतांतून गुंफला आहे.
विरही राधेला स्फुरला असेल,
स्मरण असेल तसा.

पुरेत गाणीं शृंगाराचीं ।
कृष्णसख्याच्या व्यभिचाराची ॥

असें ज्यांना खरेंच वाटतें,
त्यांच्यासाठी हा प्रयत्नच नाही.
राम-कृष्णांचे देवत्व ज्यांनी श्रद्धेने मानलें आहे
त्यांना हीं गीतें आवडावीं.
बुद्धीचे पाय जडतेशीं जखडलेले आहेत.
श्रद्धेला पंख असतात.

माझे मित्र
श्री. जयंतराव साळगांवकर
यांच्या 'शब्दरंजन' मासिकासाठी
या गीतावलीचा प्रारंभ झाला.
मासिकाचें प्रकाशन थांबलें तेव्हा
माझें लेखनहि थांबलें होतें.

श्री. भा. द. खेर व
श्री. वि. स. वाळिंबे
या मित्रांच्या आग्रहामुळे
हीं गीतें मी पुन्हा लिहूं लागलों.
सह्याद्रींतून ती क्रमशः
प्रसिद्ध झालीं.

आता हीं गीतें
पुस्तक-रूपाने प्रकाशित होत आहेत.
'केसरी' प्रकाशनाचे
श्री. जयंतराव टिळक यांचा
मी मनःपूर्वक ऋणी आहें.



श्री. साळकरांनी चित्रें उत्तम काढलीं आहेत.
त्यांचे आभार.

ग. दि. माडगूळकर

'पंचवटी'



१ *निवेदक –*

शरच्चांद्रिका मूक हुंकार देते
वनीं राधिका गीतगोपाल गाते

कदंबातळीं बैसुनी सांजवेळीं
खुळी आसवे बाळकृष्णार्थ गाळी
व्यथा अंतरींची कथारूप घेते १

जिथे बैसुनी लाडक्या माधवाने
जिवां जिंकिलें धुंद वेणूरवाने
तिथे शोधिते ती मनःशांततेते २

जिथे सांडला गोड गोपालकाला
जिथे रात्रिच्या रंगल्या रासलीला
तिथे कृष्णगाथा स्वराकार घेते ३

नसे वाद्य तालास, अंकीं न वीणा
बसे शांत एकांत श्रोता शहाणा
तिची मात्र टाळी, तिला साथ देते ४

जगा विस्मरे गोपिका कृष्णवेडी
स्मृतींनी सख्याचें चरित्चित्र काढी
सुगंधापरी वाहतीं भावगीतें ५



२ राधा -

अजन्मा जन्मासी आला
कारागारीं, अंधकारीं कृष्णजन्म झाला ।

देवदुर्लभा सती देवकी
तिच्या तनूची करुन पालखी
अनंत आलें मानवलोकीं
प्रसव-व्यथेविन, उरिं होता तो, उदरीं अवतरला १

तम मावळलें, तेज फाकलें
चारच डोळे, दिपुन झाकले
अरूप रूपीं उभें ठाकलें
देव-दुंदुभी उधळुं लागल्या मंजुळ स्वरमाला २

सुगंध सुटला एक अनामिक
मुग्ध शांतता होय सुवासिक
अद्भुत ल्यालें वेष अलौकिक
धन्य होउनी, वसुदेवांनी नमस्कार केला ३

परमानंद सापडला स्वर
उमटे वाणी गंभिर कातर –
“ जाणियलें मीं तूं सर्वेश्वर
बालरूप घे जगन्नायका, तार धरित्रीला ४

रूप गाइचें घेऊन धरणी
आली होती तुझिया चरणीं
अवघें आहे माझ्या स्मरणीं
तिज रक्षाया, जनकपणा तूं वसुदेवा दिधला। ” ५

बघतां बघतां त्रिभुवनचालक
इच्छामात्रें झाला बालक
मेघ-सावळे, नयनाल्हादक
उठे जन्मदा, कुशींत होता रुदन शब्द ओला ६

‘ सोऽहं सोऽहं ’ नाद उमटतां
वळुनी कवळी देवकिमाता
फुटला पान्हा, तान्हा बघतां
तुटे शृंखला, बंधनांतुनी मोक्ष करीं आला ७

बाहेरून तो गर्जे वारा
नाचुं लागल्या श्रावणधारा
भिजलीं दारें, भिजली कारा
झडलीं कुलपें, कड्या उघडल्या, बंदिवास सरला ८



३ राधा –

देवकी सांगे वसुदेवां
बाळ हा नंदघरीं न्यावा

हाच अपेक्षित पुत्र आठवा
रक्षणार्थ या दूर पाठवा
गगन-भाषितें जुनीं आठवा
वधिल हा मथुरेच्या रावा १

अवचित वार्ता कळेल कंसा
दया न माया तया नृशंसा
धांवेलच तो खळ विध्वंसा
चंद्र ना राहुकरीं जावा २

जाणितसे मी प्रिया अंतरीं
उजेडांत वा अंधकारीं
लपूं न शकते कधी कस्तुरी
हट्ट हा तरिही पुरवावा ३

कळतें मज हा फणींद्रशायी
जरा मरण या नव्हतें, नाही
परी नाथ, मी याची आई
भाव हा वेडा उमजावा ४

मज वेडीच्या अनुभव गाठीं
अंकुरलीं जीं माझ्या पोटीं
तीं तीं गेलीं तुटून रोपटीं
हा तरी वृक्ष थोर व्हावा ५

निजले रक्षक, उघडी कारा
पर्जन्याच्या वर्षति धारा
अंधारावर वाजे वारा
जपुन घ्या जीवीच्या जीवा ६

थांबा, लाविन उरीं एकदा
बाळा, मी तव माय जन्मदा
वाढवील तुज व्रजीं यशोदा
सुखें जा दास्यमुक्त गावा ७

जपुनी टाका नाथ, पाउलें
मार्ग निसरडे असतिल ओले
हृदयाहुन हें मृदुल तान्हुलें
अतुल हा पुण्याचा ठेवा ८



४ राधा -

निजवंशदीपका धरुन शिरीं
वसुदेव निघाले नंदघरीं

मुसळधार वर वरुषे पाउस
पथिक चालला निर्भय-मानस
अंगच अवघें झालें डोळस
पथ दिसे तमींहि दूरवरी १

कसली उतरण, कसली चढती
पायघड्यांसम पायांपुढती
स्वयेंच वाटा पथ उलघडती
प्रभुनाम घोळवित जिभेवरी २

वेग अकल्पित भरे पाउलीं
शेष अनुसरे करित सावली
बाळ सुरक्षित, अचल टोपली
चहुदिशीं तमिस्रा रडे तरी ३

तोंच अचानक करित गर्जना
आडवि आली सरिता यमुना
उधळित ऊर्मि, फेकित फेना
यमभगिनी दिसे ती तदा खरी ४

थांबायाते कुठला अवसर
विचार करुनी एकच पळभर
वसुदेवांनी जोडियले कर
तिज म्हणति, ' ओघ तूं, तूंच तरी ' ५

जनक उतरला जळीं सुतासह
चढलें जळ तों, अतीव दुःसह
पुरांत गवसें जणु पंकेरुह
तनु तुटे, तरंगें फूल वरी ६

चढतां चढतां चढली यमुना
चढुनी भिडली श्रीहरि चरणां
एकच घेउन तृप्त चुंबना
झरझरा परत ती जाय दुरी ७

दुभंगलें जळ बघतां बघतां
मार्ग झळकला, दिसली सिकता
भांग जणू की रमणीमाथा
जलशैल दोन, त्यामधुन दरी ८

पिता-पुत्र काजळरात्रीं, गोकुळांत आले
शांत शांत अवघें खेडें, जसें चित्र ओलें

घरें झोपड्या, की झाडें, सर्व कृष्ण-रेघा
नसे कोठल्याहि वृक्षीं पक्षि एक जागा
महावात, पर्जन्याचें पर्व सरुन गेलें १

दिवे डोंगरासी गेले, लागलीं कवाडें
कोण वाट कोठे गेली लोचनांस कोडें
पाउलास रोधी पाणी पथीं साचलेलें २

थेंब थांवलेला पानीं, ओघळे तळाशीं
तोच नाद मोडी थोडा, स्तब्ध शांततेशीं
गोप आपुल्याल्या गेहीं, गाढ झोपलेले ३

गव्हाणींत झोपीं गेले खेळ वासरांचे
मुके साद गोठ्यामाजीं, चाळ घुंगुरांचे
उभ्या उभ्या घेती झोपा, अश्व बांधलेले ४

उगा जाग आली नाही, कुणा सारमेया
योग शांततेचा आणी, असा योगमाया
नंदराजद्वारापाशीं वासुदेव ठेले ५

खुल्या कवाडांनी केलें, दिव्य स्वागतासी
दहा दिशा ज्योती झाल्या, दाविती पथासी
देवकीपतीचे तेथे, श्वास मुक्त झाले ६

नवप्रसू शय्यागारीं, दिसे नंदराणी
दास सेविकाहि नाही, आसपास कोणी
बाळ एवढेसें कुक्षीं, नवें जन्मलेलें ७

प्रसवमूर्च्छनेच्या सौख्यीं, रंगली यशोदा
तिच्यापुढे कृष्णपित्याने, ठेविलें मुकुंदा
तिचें बाळ पत्र-प्रेमें

*[ गीतांकित हरिचरित गातां गातां राधेला, नवप्रसू देवकीचें केविलवाणे बोल जसेच्या तसे आठवले... ]*

देवकी –

निराधार मी भीरू भगिनी, तूं माझा भ्राता
नको रे, मारूं नवजाता
नको आपटूं अर्भक, कंसा,
अरिमर्दन ना, ही तर हिंसा,
अबलावध तूं करिसी कैसा ?
शिशुहरिणीची पारध कां तुज शोभे बलवंता ? १
स्मरतीं मज तीं गगनभाषितें
भय तव मनिंचें मीहि जाणितें
भागीनेय तो भैरव तूं ते
पुत्र नव्हे हा भोजपालका, ही दीना दुहिता २
सात बालकें, इवलीं इवलीं
शिळातळावर तूं आदळलीं
मीं मातेने स्वयें पाहिलीं
रडण्याइतकें नुरलें पाणी, नयनांतरिं आता ३
एक भीक मज दे दे राजा
माझी मज ही असो आत्मजा
ही कां ग्रासिल तुजिया तेजा ?
परंपरेने स्नुषा तुझी ही, धीरा, धीमंता ४
नको निर्दया, उचलूं हातां
कुठे लोपले देव, देवता !
बघा दिशांनो, धांवा, नाथा,
अहा, निसटुनी दिगंतरातें गेली विद्युल्लता ५
भ्याडा, कां तव नजर वावरी ?
जगज्ज्योति ती, प्रभा ईश्वरी
लाथाडुनी तुज जाय अंबरीं
हिच्याचसाठी मूर्खा, तुज मी आळविला होता ६
भयें बधिरल्या पिसाट कानीं
ऐकिलीस कां अमृत-वाणी ?
सांगुन गेली स्वर्गपक्षिणी –
" – कुठे तरी तो वाढत आहे, कंसाचा हन्ता ! " ७





७ राधा –

मधुभाष दुंदुभींनी सानंद घोष केला
नंदास पुत्र झाला !

आनंद नंदराजा आनंदली यशोदा
आनंद गोपिकांना, आनंद गोपवृंदा
आनंदरूप आलें, अवघ्याच गोकुळाला १

नंदाघरीं मिळाले, ज्योतिष्यशास्त्रवेत्ते
पुण्याहवाचनाने, प्रारंभ उत्सवातें
व्रजराज नंद घेई, अंकीं अधोक्षजाला २

विधियुक्त जातकर्मा, केलें द्विजोत्तमांनी
आशिर्वचांत न्हाले नृप, राजपुत्र दोन्ही
भरवी स्वयेंच राजा, मधुबिंदु अर्भकाला ३

गोदान लक्ष झालें, झालीं अनेक दानें
संतुष्ट विप्र केले, आनंदल्या नृपाने
तों सूतमागधांनी, जयनाद तृप्त केला ४

पथ, अंगणें, तिवाटा    शिंपून चंदनाने
गोपांगना तयांना,    शृंगारिती कलेने
त्या रम्य रंगवल्ली,    आल्या जणुं भराला    ५

जेथे तिथे पताका,    द्वारीं सुपुष्पमाला
शृंगारिलें प्रजेने,    प्रेमें घराघराला
आनंदनृत्य झाल्या    उत्स्फूर्त बाललीला    ६

बलिवर्द धेनुकांच्या,    आल्या सजून झुंडी
गोमाय त्यांत कोणी,    पान्हा पथांत सांडी
गाती सुखी, गुराखी,    स्वर अंबरास गेला    ७

व्रजसुंदरीं निघाल्या,    घुमवीत गोड गाणीं
गोपाळ-बाळ आले,    फेकीत दूध लोणी
कालिंदिच्या तटाकीं    ये पूर कौतुकाला    ८

बलराम रोहिणीहि,    पौरांत पौर झाली
अमरावती सुरांची,    जणु गोकुळांत आली
शुभमास नाम लाभे,    हरितांग श्रावणाला    ९

नंदास पुत्र झाला,    नंदास पुत्र झाला
भारून नाद टाकी,    भूमीसवें नभाला
दाही दिशांतुनीहि,    प्रतिशब्द तोच आला    १०



८ राधा –

दिवस मास चालले, बाळकृष्ण वाढतो
समय-पुरुष भूवरी, स्वर्ग-चित्र काढतो

हरित वृक्षवल्लरी, वाढलीं फुलें, फळें
दुधाळ धेनु जाहल्या पुष्टगात्र गो-कुळें
सूर्य त्या सुखावरी, सुधातुषार सोडतो १

कृष्णवर्ण आपगा, भरून धुंद वाहतें
कृष्णकांति त्या जळांत, सर्व गाव नाहतें
क्षेत्रजात सस्यसंध, पुऱ्या पुरास वेढतो २

सदाकदा व्रजांगना, सोडुनी मुलां घरां
नंदगेहीं येउनी, पाहतात श्रीधरा
तोहि द्वाड हासतो, पदर, केश ओढतो ३

धेनुवृंद सोडुनी, गोपहि वळे जरा
नृपांगणांत जाउनी, पाही श्यामसुंदरा
बघून बालब्रह्म तें, सहज हात जोडतो ४

माय आणि रोहिणी, जमुन दास सेविका
न्हाऊं माखुं घालिती, अखिल जगच्चालका
तोहि दावी कौतुकां, रडत पाय झाडतो ५

यशोमती सुताचिया, नयनिं भरी काजळा
पेड पेड गुंफिते, विंचरून जावळा
चिडुन चिडुन श्रीहरी, गळा उगीच काढतो ६

भात-दही भरवितां, फिरवी तोंड सावळा
अबोल बालहट्ट तो, तिन्ही जगांत आगळा
राग काय बाई तो, माळ धरून तोडतो ७

अंतिं कवळ एक ती, मुखांत घेइ आपुल्या
अबोलक्यापणें म्हणे, घास घेई सोनुल्या
चुंबनासवें सखा, घेई घास गोड तो ८

चार घास सेवितां, पेंग येइ मोहना
खुणावतां कुणी कुणा, सिद्ध होई पाळणा
बाळ आंत ठेवितां, हसे उठून द्वाड तो ९

पडुन पडुन बोलतो, शब्द कांही बोबडे
डोळियांस चोळितां, मळुन जाय अंगडें
असेंच खेळ खेळतां, झोपिं जाय गाढ तो १०



९ बोबडा बलराम –

दूद नको पाज्यूं हलीला काल्या कपिलेचें
काला या मनती आई ग, पोल गुलाक्याचें
तूंच घेउनी पद्लाखाली
पाजत जा या शांज-शकाली
तुजियाशम गोलें, होउंदे लूप शोनुल्याचें १
तूंही गोली, मीहि गोला
काला कां हा किश्न एकला ?
लावुं नको तित्ती, नको ग बोत काजलाचें २
थेउं नको ग याच्यापाशीं
वाल्यामधल्या काल्या दाशी
देउं नको याला, नहाया पानी यमुनेचें ३
पालन्यांत तूं याच्या घाली
फुलें गोजिलीं चाप्यावलली
लावित जा अंगां, पांधलें गंद चंदनाचें ४
नकोश निजवूं या अंधालीं
दिवे थेव ग उशाश लात्लीं
दावुं नको याला कधीही खेल शावल्यांचे ५
नको दाखवूं, नको बोलवूं
झालावलचे काले काऊ
हंश याश दावी, शाजिलें धवल्या पंखांचे ६
हंशाशंगें याश खेलुंदे
चांदाशंगें गोध्थ बोलुंदे
ल्हाउं देत भवतीं, थवेही गौल-गोलनींचे ७
मथुलेहुन तूं आन चिताली
गोली कल ही मूल्ती काली
हशशी कां बाई, कलेना कालन हशान्याचें ? ८



१० *[ एके दिवशीं स्वतः यशोदाच सवतीला व सख्यांना सांगूं लागली ... ]*

*यशोदा –*

दावितो खेळ हा जगानिराळे कांही
कृष्णास बाळ या कसें म्हणूं मी बाई !

मी घुसळण घुसळित होतें एके दिवशीं
हा रांगत रांगत आला गे मजपाशीं
वेणीस धरुनिया उभा सावळा राही १

राहिला उभा हा, ओठ बिलगले कानां
मज कळे मागणी, उरीं दाटला पान्हा
हा पाडस माझें, मी जन्मदायिनी आई २

'क्षण थांब' – म्हणालें – 'काम हातचें करितें'
त्यानंतर तुजसी पदराखाली घेतें,
केव्हढा राग तो ! रडे, आपटे डोई ३

मी चिडुन म्हणाले, 'हट्ट वाढला भारी'
रागांत त्यावरी दूर पळाली स्वारी
मी दोर रवीचा तरीहि सोडला नाही ४

हा परतुन आला, काठी घेउन हातीं
हाणला अचानक घाव घड्याच्या माथीं
नवनीत कशाचें, ताकहि वाहुन जाई ५

मी संतापुनिया कान कोवळा धरिला
बांधून ठेविला उखळीसंगें हरिला
बोललें, ‘ राहशिल आता एका ठायीं ! ’ ६

ती अवजड उखळी कणखर कोरें दावें
त्या भार-बंधना गजेंद्र-शावक भ्यावें
परि हरी मात्र त्या सहजच पेलून नेई ७

कर उजवा रुतवीं, गुडघा डावा टेकी
हरि सवेग रांगत सुटला एकाएकी
ती उखळी त्याच्या मागे मागे येई ८

अंगणीं जाणतां, अर्जुन होते दोन
श्रीकृष्ण पोचला त्याच स्थळीं जाऊन
त्या उभय तरूंना अटकुन उखळी राही ९

सामर्थ्य लावुनी, ओढ घेतसे कान्हा
ती हले न उखळी, सोडुन तिचिया स्थाना
इतक्यांत कडाकड नाद विजेसम होई १०

ते तरू कोसळुन पडले भूमीवरती
ही मुक्त ठाकली दूर, सावळी मूर्ति
शैशवीं कुणाच्या घडेल घटना का ही ? ११



राधा –

११ मायाविनी पूतना,
वधाया आली मधुसूदना,

नटुनी थटुनी दिव्याभरणीं
नंदघरीं ये सुंदर रमणी
स्तिमित यशोदा, स्तिमित रोहिणी
निजगृहिं पाहुन देवांगना १

सु-गौरकांती सुहास्यवदना
पृथुलनितंबिनि सुरुचिरवसना
पीनस्तनिं ती मीनलोचना
लोभवी महिलांच्या लोचना २

मूक दासिजन, मूक यशोदा
जिभा न धजल्या करूं संवादा
कटाक्ष टाकुन एक एकदा
देवि ती शोधी यदुनंदना ३

शयनागारीं रत्नमंचकीं
बाल-कृष्ण दे उगीच उचकी
कौतुकेंच ती त्यास विलोकी
पाहतां धांवे मधुचुंबना ४

हा परतुन आला, काठी घेउन हातीं
हाणला अचानक घाव घड्याच्या माथीं
नवनीत कशाचें, ताकहि वाहुन जाई ५

मी संतापुनिया कान कोवळा धरिला
बांधून ठेविला उखळीसंगें हरिला
बोललें, ‘ राहशिल आता एका ठायीं ! ’ ६

ती अवजड उखळी कणखर कोरें दावें
त्या भार-बंधना गजेंद्र-शावक भ्यावें
परि हरी मात्र त्या सहजच पेलून नेई ७

कर उजवा रुतवीं, गुडघा डावा टेकी
हरि सवेग रांगत सुटला एकाएकी
ती उखळी त्याच्या मागे मागे येई ८

अंगणीं जाणतां, अर्जुन होते दोन
श्रीकृष्ण पोचला त्याच स्थळीं जाऊन
त्या उभय तरूंना अटकुन उखळी राही ९

सामर्थ्य लावुनी, ओढ घेतसे कान्हा
ती हले न उखळी, सोडुन तिचिया स्थाना
इतक्यांत कडाकड नाद विजेसम होई १०

ते तरू कोसळुन पडले भूमीवरती
ही मुक्त ठाकली दूर, सावळी मूर्ति
शैशवीं कुणाच्या घडेल घटना का ही ? ११



राधा –

११ मायाविनी पूतना,
वधाया आली मधुसूदना,

नटुनी थटुनी दिव्याभरणीं
नंदघरीं ये सुंदर रमणी
स्तिमित यशोदा, स्तिमित रोहिणी
निजगृहिं पाहुन देवांगना १

सु-गौरकांती सुहास्यवदना
पृथुलनितंबिनि सुरुचिरवसना
पीनस्तनिं ती मीनलोचना
लोभवी महिलांच्या लोचना २

मूक दासिजन, मूक यशोदा
जिभा न धजल्या करूं संवादा
कटाक्ष टाकुन एक एकदा
देवि ती शोधी यदुनंदना ३

शयनागारीं रत्नमंचकीं
बाल-कृष्ण दे उगीच उचकी
कौतुकेंच ती त्यास विलोकी
पाहतां धांवे मधुचुंबना ४

बहर अकारण वत्सलतेला
तिने कितिकदा बाळ चुंबिला
लीलानट तो लटकें हसला
गळ्यांतिल ओढितसे दागिना ५

क्षणांत दृढतर ओळख झाली
अंकीं घेउनि श्रीवनमाली
तिने झाकला पदराखाली
प्रीतीने करवी स्तनपाना ६

बालवत्सला अंतरिं तोषुन
स्तन्य तियेचें हरि घे शोषुन
स्तन्यासह घे प्राणही प्राशुन
भिउन ती मांडी अक्रंदना ७

नीलकंठसें पीत हलाहल
बाल-ब्रह्म ते राही निश्चल
कंसप्रेषिता झाली व्याकुल
मृत्युच्या डसती तिज यातना ८

फिरवी डोळे, झाडी कर-पद
मूल-रूप ये तिला भयप्रद
रडे राक्षसी, स्वर ये गद्‌गद
" सोडि रे सोडी अरिमर्दना " ९

जळवेपरि तिज बाळ चिकटला
विष-रस त्याने पूर्ण निपटला
श्वास थांबला, देह ताठला
व्हाव ती गेली यमसदना १०

मृत देहावर, श्रीयदुनंदन
अग्र स्तनाचें सोडि मुखांतुन
हसे, जननि ते वळुनी पाहुन
तिला पण, नावरली मूर्च्छना ११

[ एकदा स्वत: कृष्णमातेनचे रोहिणीला सांगितलें – ]

यशोदा –

रोहिणी, जरा घे मांडीवरती याला
खाजवी कान हा, हरी निजेला आला

मी पेलुं न शकतें याला माझ्या हातीं
उच्छ्वास अडखळे, दडपुन गेली छाती
आश्चर्य म्हणूं की म्हणूं अनामिक भीति
पापणी हले ना, कंप शरीरीं भरला १

घाबरूं नको ग, मला न कांही झालें
माझ्याच दुधाच्या सामर्थ्या मी भ्यालें
परब्रह्म गोकुळीं असे निवासा आलें
मी कशी जोजवूं, स्तन्य पाजवूं याला २

ओसरीवरी मी बसलें होतें आता
हा बाळ आडवा अंकावरतीं होता
वाऱ्यांत नाचवित उगा पाउला-हाता
सावळा कोवळा बकुळ-फुलांचा झेला ३

भुरभुरे रेशमी जावळ कुरळें काळें
चिमुकले सोनुले काजळरेखित डोळे
पोकळी मुखाची, हास्य तीमधे खेळे
पाहतां पूर ये माझ्या वत्सलतेला ४

झाकला पदरिं मी तोषुन माझा तान्हा
लडिवाळ भुकेच्या ओठीं दिधला पान्हा
मनसोक्त प्यायला, प्रसन्न झाला कान्हा
मुखचंद्र हासरा पदराआडुन आला ५

मी बघत राहिलें वेड्यापरि ग बाई
जांभई मुकुंदा तोंच अचानक येई
जांभई कशाची, अतर्क्य ती नवलाई
हरिमुखीं मला पट ब्रह्मांडाचा दिसला ६

पाहिलें गगन मीं, चंद्र, दिवाकर, तारे
दशदिशा देखिल्या, त्यांस डहुळते वारे
नवखंड धरित्री, स्वर्गलोकिंचीं द्वारें
पाताळलोकहि नयनांपुढती आला ७

आसिंधु वाहत्या नद्या पाहिल्या डोळां
पाहिलीं अरण्यें, चढत्या पर्वतमाळा
वदनांत जाहलीं अवघीं तीर्थें गोळा
मम दृष्टिभ्रम त्या तीर्थांमाजीं न्हाला ८

खेचरें, भूचरें, मनुज, निशाचर, यक्ष
पाहिलें चराचर, प्राणी कोटी लक्ष
बहुसाल वल्लरी, तृणें, रोपटीं, वृक्ष
त्यांवरी अचानक प्रळय-घडीचा घाला ९

उसळतें देखिलें केवळ पाणी पाणी
तें दृश्य कथाया अपुरी होते वाणी
दावितां कोण तो ? आणि पाहिलें कोणी
मी भ्रमलें बाई, तोल तनूचा गेला १०

मी मला आवरून ताठ ठेविली मान
प्रलयांत तरंगे एकच पिंपळपान
त्यावरी हरी हा असाच निजला सान
अंगठा पदाचा ओठीं त्याने नेला ११



चालूं बोलूं शिकला आता, बाळकृष्ण बोबडा
नका म्हणूं ग मुका मुकुंदा, नका म्हणूं लंगडा
सदैव चाले याची क्रीडा
पुरें न अंगण, अपुरा वाडा
पद्मदळांसम घरभर याच्या पद-चिन्हांचा सडा १
खेळ खेळतां भावासंगें
हा गुडघ्यावर लटका रांगे
झुंझ घ्यावया धांवून जाई वृषभासह वाकडा २
माथें माथ्यावरी आदळी
चिडुनी फोडी वर डरकाळी
घटका घटका असा चालतो हरि-रामांचा लढा ३
कधि दोघेजण मुंडुक होतीं
भूमीवरती स्वैर पोहतीं
उड्या मारिती, सूर लाविती दर्दुर – जैसा खडा ४
विहग-कूजनें, वन्य गर्जना
अनुकारातें दाविति नाना
सांगुन सांगुन थकतो यांना दासीगण बापडा ५
ओलांडुनिया कधी उंबरा
हा दुसऱ्यांच्या जातो द्वारा
गोपींसन्मुख उभा ठाकतो शिवापरी नागडा ६
तरुणी, वृद्धा असोत कोणी
मागतसे हा दहि, दुध, लोणी
घुसळण-डेऱ्यापाशीं जातो, निरपुन घेतो कडा ७
कोणाचाहि दिसतां गोठा
आंत घुसे हा धीट पोरटा
कासेखाली जाऊन देतो, गाउलिला हुंदडा ८
गावामधले बाळ गुराखी
अवघे स्नेही याच्या लेखीं
गोष्टी सांगत बसतो त्यांना जमवुन हा चिमुरडा ९
आवरणें तरि कुठवर आता ?
वाढत्यास या देव रक्षिता
कुणी तरी हरिकंठीं बांधा दृष्टि-मणी तेवढा १०



१४ [ गौळणींनी यशोदेपाशीं येऊन गाऱ्हाणीं घातलीं. कृष्णाविरुद्ध कागाळ्या केल्या. लडिवाळ बाळकृष्ण, आईला एकांतीं गाठून म्हणतो कसा ... ]

बाळकृष्ण –

सांगती खोटें त्या गौळणी
आइ ग, मी न चोरिलें लोणी

मला न चोरी शब्द ठाउका
आळच घेती वृथा गोपिका
ऐकवतीं तरि कशीं तुला हीं निंदेचीं बोलणीं ? १

मी हा इवला, पोर चिमुकला
सुचेल चोरी कैसी मजला ?
काय जाणुं मी कुठे कुणाचीं लोण्याचीं बोगणीं २

घट लोण्याचें शिंक्यावरतीं
ते येतिल का माझ्या हातीं ?
मुख वत्सांचें काय पोचतें, दाराच्या तोरणीं ? ३

कां नंदाच्या कुळांत जगतीं
मीच उपजलों पुनः मारुती ?
उपजतांच जो उडे अंबरीं धरण्या वासरमणी ? ४


मी नच जातो सोडुनिया घर
इथेच असतो साऱ्या दिसभर
दादासंगें खेळ खेळतो; सोप्यावर, अंगणीं ५

कुशींत निजतो तुझ्याच रातीं
जागविसी मज तूंच प्रभातीं
नवनीताचें नांव न घेतो स्वप्नांतिल भाषणीं ६

सहज बिलगतां लाडे लाडे
तुझ्या उरीं मज सुधा सापडे
माझ्यासाठीं ओसंडति घट, केल्याविन मागणी ७

कोणा घरिं मी कां मग जाऊं ?
कशास चोरून लोणी खाऊं ?
साठविती कां कुणी सुधा त्या मातीच्या रांजणीं ? ८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र.
काव्य
सं. शाखा (स्थळ प्रत)



१५ *[ गोकुळीं कृष्ण असा वाढत असतांनाच, ग्रामस्थांचा पुढारी असलेला उपनंद नांवाचा एक वृद्ध गोपाल नंदाला म्हणाला ... ]*


*उपनंद –*

व्रजवासा सोडुनी
चलावें नंदा, वृंदावनीं

अन्नोदक या इथलें सरलें
व्रजांत आता सुख ना उरलें
अवघ्या ग्रामस्थांचें ठरलें
दुजा ठिकाणीं जावें सोडुन घरें येथलीं जुनीं १

राम कृष्ण तव तनय नृपाळा
देवापरि प्रिय सर्व गोकुळा
दैव धांवतें धरूं त्या बाळा
गावठाण हें जणू जाहलें उत्पातांची खनी २

शकट कोसळे आज अकारण
उद्या नाचते वादळ दारुण
परवा पडती वृक्षच उलथुन
आणि तेरवा येई पूतना मायावी डाकिनी ३



असूत्र असतिल या घटना का ?
जाणत्यासही भिववी शंका
व्रजाधिपा, हे गोप-पालका !
एकच निर्णय म्हणुन घेतला अवघ्या वृद्धजनीं ४

सोडुन इथलीं घरें, वावरें
संगें घेऊन गुरें, वासरें
वृद्ध, स्त्रिया, धन, मुलें-लेकरें
दुसऱ्या ठायी जाउन राहूं, नगर नवें वसवुनी ५

दूर न येथुन गिरि गोवर्धन
तया तळवटीं पैस पटांगण
निबिड भोवतीं आहे कानन
कालिंदीही तिथे पोचते श्यामल जलवाहिनी ६

वृंदावनिं त्या गाव उभारूं
भूमि नांगरूं, शेती पेरूं
नदीतटाकीं गोधन चारूं
गोपालांची अवघी भूमी, तूं गोपांचा धनी ७

१६ राधा –

सहज सोडुनी वृक्ष, उडावा विहगवृंद व्योमीं,
प्रजा व्रजाची तशी निघाली ओलांडित भूमी !

मागे पुढती तरुण चालती, शस्त्रें त्या हातीं
तेच दाविती मार्ग वनांतरीं इष्ट दिशे नेती
तेच राखिती अमोल गोधन सतत अग्रगामी १

शकटामागे शकट चालती आकारित ओळी
शुभ्र पांढरे बैल हाकते गोपाकृति काळी
लव न कुणाचें लक्ष मागच्या ग्रामीं वा धामीं २

गौर देखण्या कुणी गौळणी मंदगती जाती
मुखें वळवुनी नंदरथाचें शुभदर्शन घेती
संसाराहून मानस त्यांचें रमे घनःश्यामीं ३

कुणी गुराखी सहजानंदे वाजवितो पावा
कृष्णागम तो जणू सुचवितो वसणाऱ्या गावा
दूर निजरथीं पिटितो टाळ्या, जगताचा स्वामी ४



उच्च स्वर तो मुरलीरवाशीं दुरुनी संवादे
आघाडीवर गर्जत उठली तालासह वाद्यें
सौख्यभारले देह काय मग उरती गजगामी ? ५

नाचुं लागती युवती, झरतो नूपुरव पायीं
कान उभारुन फिरती मागे वत्सांसह गाई
आवरितां त्या, बळी गोपही थबथबती घामीं ६

नृत्य चाललें, गीत चाललें, सुखयात्रा चाले
मागे सरलीं डोंगर, रानें, माळ, नदी, नाले
सैन्य निघालें जणू होउनी विजयी संग्रामीं ७

नंदरथाच्या जवळिं होता शकट तिथे माझा
अनिमिष डोळां न्याहळला मी कृष्ण बाळराजा
विसरुन गेलें वृषभानूची सुता राधिका मी ८

राधा –

वाढ वयाची नवरी सुंदर
पती चिमुकला श्रीदामोदर

कथेंतली या मीच नायिका
वृषभानूची सुता राधिका
आठवणीने अजुनीहिं त्या,
कंठीं माझ्या दाटे गहिवर १

कधी एकदा सहज दुपारीं
गेले होते यमुनातीरीं
माथीं होता भार धुण्याचा,
कमरेवरतीं होती घागर २

डगर उतरुनी जातां खाली
धून मुरलीची एक ऐकली
रोमांचांनी देह डवरला,
उगिच बावरें झालें अंतर ३

दूर कदंबाखाली, भवतीं
मुलें व्रजांतिल जमलीं होतीं
मधे शिळेवर होता बसला,
राजा माझा श्याम मनोहर ४

मोरपिसांचा मुकुट शिरावर
कटिस रेशमी रम्य पितांबर
अधरीं अलगद धरिली मुरली,
फिरे अंगुली, झरवित सुस्वर ५

घटा-पटांचें भानच गळलें
पाउल माझें तिकडे वळलें
टाकुन दिधलें ओझें कळशी,
आणि बोललें, ' स्वर हे आवर ' ६

धांवत गेलें खुळ्यासारखी
उभे ठाकले बाळ गुराखी
उठुनी हसला मनमोहनही
उरे न माझा पदर उरांवर ७

अगदी नकळत, अगदी नकळत
राहियलें मी हरिस न्याहळत
काय जाहलें पुढे, त्या स्थळीं
माझें मज न कळलें त्यावर ८

स्वप्नांतुन मी जधीं जागलें
तेव्हा कळलें, लग्न लागलें
मुलामुलांचा खेळ संपला,
राधामाधव झाले वधुवर ९

भानावर मी आलें, आलें
जलधारेच्या जवळ धांवलें
पदर-पितांबर गाठ न सुटली
माझ्यासंगें आला यदुवर १०

जळांत दिसल्या मग पडछाया
विवाहिता मी हरिची जाया
खेळामधला मेळ परी हा,
सत्य न झाला कधीहि नंतर ११



संगतीं गोप-गडी घेऊनी
खेळतो माधव वृंदावनीं
करीं शिदोरी आणिक काठी
एक कांबळें टाकुन पाठीं
फिरे मुरारी गाईपाठीं
सवंगड्यांसम अगदी साधा गोपवेष घेउनी १
कुणी गुराखी पळे वाकडा
नाक खाजवी कुणी माकडां
त्याच्यासम कुणि झोंबे झाडां
कुणी दावितो विचित्र क्रीडा; हातावर चालुनी २
कुणि मोराचा साद घुमवितो
कुणी पारव्यावाणी घुमतो
कुणी पाखरांपाठीं रमतो
कुणी पाडतो फळें रानटी, काठीने ढोसुनी ३
एक शिणेचे दोन सवंगडी
पांघरवुनीया त्यास घोंगडी
सोंग वळूचें कोणी काढी
तसेंच सजवी सोंग श्रीहरी बळिभद्रा घेउनी ४
खेळत खेळत गोधन चारित
वनीं तृणांतून फिरतां अविरत
कुणी अचानक पळे ओरडत
त्याच्यामागे अवघे जाती, वाऱ्यावर धांवुनी ५
कोलाहलिं त्या व्यर्थ बावरून
चहूं दिशांना धांवें गोधन
जो तो अपुलें आणी शोधुन
एक सरसरा चढे तरुवर पक्व फळें पाहुनी ६
एका वृक्षीं चढून गुराखी
फळें शेलकीं अर्धी चाखी
तळीं ओंजळिंत हरिच्या टाकी
श्रीरामासम कृष्ण तुष्ट हो उष्टें तें सेवुनी ७
तुरट आवळा त्यावर पाणी
अविट गोडवा जिभेस आणी



म्हणुनि जळास्तव धांवे कोणी
एकापाठीं एक धांवतीं सारे त्यामागुनी ८

सुखद वाटतां स्पर्श जळाचा
विचार नवखा, नव्या पळाचा
‘ करा आसरा वृक्ष-तळाचा – ’
एक बोलतो, ‘ चला चला रे घेऊं या जेवुनी ’ ९

कदंब तरुतळिं छाया शीतळ
तिथे मुलांचें बसतें मंडळ
पळसाचें दळ पुढ्यांत निर्मळ
नदीकिनारीं बसलीं पंगत हरळीच्या आसनीं १०

मध, दध्योदन, भाकर, काला
जो तो वाढी श्रीगोपाला
सहभोजन ये सुखें भराला
उच्छिष्टासी थवा खगांचा येतो मग उतरुनी ११

भरल्या पोटीं पुन्हा धांवणें
पुन्हा नव्याने सुरू खेळणें
मधे बोबडा गाई गाणें
वेणु वाजवी श्याम मनोहर शिळातळीं बैसुनी १२

वनीं विहरतां ते मुरलीस्वन
निश्चल यमुना, निश्चल गोधन
दूर थांबती गोपी थबकुन
चित्र कितीकदा पाहियलें मीं मनोमनीं मोहुनी १३

१९

*[ एकदा कृष्णसखा पेंद्या घोळघोळून एक कथा ऐकवूं लागला ... ]*

*पेंद्या –*

बळवंताहुन बळी बाळ हा, दिसतो जरि पोरगा
कृष्ण हा देवाहुन दांडगा

त्या दिशीं नदीच्या काठीं घडली कथा
साक्षीस शेकडो गोपाळांचा जथा
वाळूंत पसरलों होतों मीही स्वतः
एकाएकीं तीरासरिसा हरी धावला उगा १

दचकून टाकल्या उभ्या पेंगत्या गाई
कळलें न हरीचें करणें दादांनाही
अवघाच गुराखी थक्क होऊनी पाही
कोणालाही उमज न पडली, कोठे कसला दगा २

झुंडींत गुरांच्या नवखें कुणि वासरूं
नुकतेंच येउनी लागत होतें चरूं
कां दात खात त्या कृष्ण धांवला धरूं
पुसण्याआधी दिसलें कौतुक आसपासच्या जगा ३



पायांस मागल्या धरुनी गोविंदाने
उचलिलें वासरूं अमाप सामर्थ्याने
फिरविलें गरगरा, आपटिलें रागाने
गोपाहातीं वध वत्साचा, प्रसंग की वाउगा ४

धांवलों भराभर भवतीं आम्ही मुलें
भलतेंच कांहिसें जागीं त्या पाहिलें
राक्षसी कलेवर रक्ताने माखलें
वत्स कशाचें ? वत्सासुर तो कंसाचा टोणगा ५

म्हणतां ज्याने अमक्या घरचा नवनितघट चोरिला
यमुनातीरीं त्याच हरीने बकराक्षस मारिला
हरीने बकराक्षस मारिला

कथा तयाच्या पराक्रमाच्या नित्य सांगती मुलें
त्या दिवशींचें साहस त्याचें डोळां मीं पाहिलें
बघतां बघतां, मायावी खग त्याने संहारिला १

तापत होती दुपार भारी, तळपत होतीं उन्हें
धारेजवळी तृषार्थ जमलीं गोपांचीं गोधनें
गुरें-वासरें निदाघकालीं भिडलीं यमुनाजला २

गुरांमागुती गोपालकही सहजच शिरले जळीं
नीर लाविती नयनां, घेती पिऊनिया ओंजळी
धारेमाजीं कुणी निववितो शिणलेल्या पाउलां ३

गायीजवळीं उभा राहुनी, शीळ घालिती कुणी
कोणी करिती गो-पृष्ठांवर शीतळ जळ-शिंपणी
अनोळखी तो विचित्र पक्षी कोणी तरि पाहिला ४

भयकंपितसें ओरडला तो, सारे भांबावले
रामकृष्णही औत्सुक्याने वाळूंतुन धांवले
नगाकार खग प्रचंड होता, तटीं उभा ठाकला ५

काळदरीसम चोच तयाची, ग्रासूं पाही नभां
बगळा कसला शुभ्रगिरी तो, एक्या पायीं उभा
कृष्ण पाहतां उडे बळें तो, गिळावया धांवला ६

मीहि धांवलो तळीं टाकुनी हातामधल्या हला
गिळला तोंवर कृष्ण बकाने, उठवित कोलाहला



मूर्च्छित झाला राम, लागले बाळ गुराखी रडूं
त्या पक्ष्याचें धूड लागलें वाळूंतुन तडफडूं
दिवसा आला पूर तमाची, कांहि दिसे ना मला ८

चोच भाजली, जळली टाळू कंठ लागला जळूं
मूर्तमंत तें तेज न शकला पापात्मा तो मिळूं
अति तळमळला, गिळलें बाळक हळूहळू ओकला ९

नाचुं लागले पुन्हा गुराखी, राम तक्षणीं उठे
प्रचंड पक्षी-राक्षस ठाके, कृष्ण बाळ धाकुटें
काय सांगुं मग पुढती तेथे, संग्रामचि रंगला १०

पक्षी-राक्षस धरूं पाहतां रुंद उघडुनी मुखा
चोच पकडुनी चिरी तयाला गोपालांचा सखा
शकलें केलीं दोन तयाचीं, दो बाही फेकला ११

२१ व्रजांतल्या साऱ्या आबाल-वृद्धांना श्रीकृष्ण म्हणजे देव वाटत होता. एखादी करंटी खाष्ट म्हातारी तरीहि म्हणत राह्यची ...

म्हातारी –

अवतार म्हणा की म्हणा आणखी कांहीं;
या नंदसुताचें लक्षण बरवें नाहीं.

मी असेन बहिरी, परी ऐकतें सारें,
कानांत हरीच्या शिरलें आहे वारें;
हा घरघरांतिल चोरुन लोणी खाई.

निर्लज्ज जमविली याने वानरसेना,
ती घराघरांतिल जाणें कोना-कोना
उतरंड कुठे वा शिंकें कुठच्या ठायीं

गोठ्यांत शिरुन हा गुरें-वासरें सोडी,
मारुनी खडे घट, माठ, रांजणा फोडी;
कां नंद न घाली खोडा याचे पायीं ?

मथुरेस गौळणी जातां हाटासाठी,
वाटेंत दुष्ट हा लागे त्यांच्या पाठीं;
पदरास झोंबतो, बळें हिसकतो बाही.

अपरात्रिं जमवुनी तरण्या पोरीबाळी,
बासरी वाजवित नाचे त्यांच्या मेळीं;
ही कुण्या देशिंची रीत म्हणावी बाई.

लाविल्या कैक ग पोरी याने छंदा,
घरकाम विसरती, रानामधला धंदा;
अलगूज वाजतां जी ती बिथरुन जाई.



काढुनी निमित्तें, धुणें, पाणी,
यमुनेस धांवती अवध्या वेड्यावाणी;
आंधळी म्हणावी काय यशोदामाई ?

तो बाळ कशाचा काळ नीतिचा काळा,
कां गाव त्याकडे करिते कानाडोळा;
हें गूढ वाकडें, मजसी उमजत नाही.

२२ *पाणवठ्याच्या वाटेवर एक षोडशी, एका सकाळीं राधेलाच सांगते, विचारल्यावांचूनच सांगते ...*

*षोडषी –*

प्रियकर माझा हरी
अगदी नकळत येतो, जातो माझ्या मनमंदिरीं

पोर नव्हे ग, पूर्ण पुरुष तो
मज प्रीतीने जवळीं घेतो
माझ्या नयनीं नयन मिळवितो, हनू उचलितो वरी

मुरलीरवासम मधुर बोलतो
अंगीं हृदयीं वसंत फुलतो
मुकेपणीं मी मान टेकतें, श्यामल वक्षावरी

वैजयंतिहुनि मम करमाला
अति आवडते श्रीगोपाला
विसावतें मी, असतें नसतें त्याच्या अंकावरीं

सहज विसरतें राधे, मीपण
रात्रच होते मग कृष्णार्पण
आनंदाचा असा महोत्सव, नित्य चालतो घरीं

रात्र-कमळ तें मिटे शेवटीं
शय्येवर मी, मीच एकटी
पुनः पहाटे कानीं येते, हाकेची बासरी

स्वप्न नव्हे ग, ओठीं, गालीं
ठेवी चिन्हें श्रीवनमाली
तीळ कशाचे, लालस, श्यामल, दुखरी सुखमाधुरी



कुमारिका मी गोपकन्यका
तरि मी हरिची पट्टनायिका
तुला म्हणुन ही कथा सांगतें सूर्याइतकी खरी

हरिलीना म्हण वा हरिवेडी
हवा वाटतो हरी हरघडीं
येतें बाई, असेल आली स्वारी यमुनेवरी




## २३

*एका प्रौढ गौळणीला राधा सहज म्हणाली, एका मुलाची आई तूं, आता कशाला हा साजशिणगार? अशा अवळीं पाहिजे कशाला डोळयांत काजळ?*
*हरिवेडाने पछाडलेली ती गौळण तिला सांगते ...*

*एक व्रजांगना –*

काजळ कसलें, रंग रात्रींचा नेत्रीं मी भरितें
भेटतें स्वप्नीं श्रीहरितें

माहेरगावच्या निळ्या नदीच्या काठीं

मी गोपकन्यका फिरतें गायींपाठीं
पाहुन त्याला हसत थांबतें; पदरा सावरितें

मग एक पारवा घुमूं लागतो मनीं
'तुजपरी मिळावा पुरा पुरुष घरधनी'
तो भाव लगोलग उमटे ग लोचनीं
त्याच स्वराची तार तोंवरी देहीं झंकारितें

हरि चतुर गुराखी, न्याहळतो तो चाळा
खुदुखुदु हसतसे; मिटवित डावा डोळा
मी उत्तर देऊं काय कसें घननीळा?
फुटूं पाहतां गुपित उगा मी, सर्वांगा चोरितें

तो पुढे येऊन टिचकी देतो गालीं
गोरटेपणावर लहरत जाते लाली
कां कुणास ठाऊक, दिठीच सांडे खाली
नजर हरवतां शोधुं कशाने? डोळे होतीं रिते

त्यापुढे धिटावा त्याचा मनमोकळा
मज पिऊन घेतो सर्वांगें सावळा
सांगून काय तो समजावा सोहळा!
सवत जागृति तोच कुठुनशी, मजशी हाकारिते

सुत, पती, सासरा, सासु, नणंदा, जावा
अजुनि ना कुणाला स्नेह आमुचा ठावा
मजसाठी घुमवितो श्याम खुणेचा पावा
एकटीच मी उठून भेटीची वाट सुखें धरितें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४४६
दा. क्र. २३४४
काव्य ९११३।५८
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

कांही गोळणी भलतीच कांही तक्रार घेऊन यशोदेपाशीं गल्या .कृष्णाची आगाळिक आधीच आईच्या कानीं आलेली होती. तिने चौकशी करून ठेवली होती. तिने त्या गोळणींचीच कानउघाडणी केली.

यशोदा –

बीजहि नसतां, कशा पिकवितां निंदांचीं काननें
कुण्या मुलीचीं कुठे घेतलीं कृष्णाने चुंबनें ?

अजुन बाळ तो, म्हणुन खेळतो गोपीसंगें वनीं !
म्हणतां तसलें असेल कैसें त्याच्या ध्यानीं, मनीं !
मनोरंजना नाहित कां ग अन्य तुम्हां साधनें ?

नका नव्याने सांगूं मजसी तीच कहाणी पुनः
सत्य वाटती तुम्हांस तुमच्या माथींच्या कल्पना
निंदनीय तें अचुक निर्मिती ओंगळ तुमचीं मनें.

त्या दिवशींच्या सायंकाळीं, कालिंदीच्या तटीं
श्रीकृष्णासह नव्हती राधा एकांतीं, एकटी
गोप गुराखी अगणित होते, हाकारित गोधनें.

असेल आली राधा तेथे भरण्यासाठी जळ
उभी राहिली असेल ऐकुन मुरलीरव मंजुळ
असेल पाहिला कृपाळ प्रभु निज कांही मनमोहनें



राधानयनीं असेल उडला अवचित धुलीकण
अश्रुसारखें असेल आलें गालीं ओलेपण
दुःखी कष्टी असतिल दिसलीं हरिसी तीं लोचनें.

कणवेने हरि असेल गेला समीप अगदी तिच्या
असेल फुंकर नयनिं घातली वाऱ्याने ओठिंच्या
निघतां सल तें, असेल पाठीं हात फिरविला तिने.

राधा माधव उभय सांगती शपथेवर ही कथा
गोधूलीचा गोवर्धन कां तुम्ही करतां वृथा ?
तुमच्यासाठी काय घालुं मी ममतेवर बंधनें ?

२५



व्रजांतल्या प्रत्येक गोपीनें श्रीकृष्णाला आपला 'नाथ' मानलें होतें. आपल्या मनाच्या अदृश्य मंदिरांतच त्या त्याच्याशीं प्रेमालाप करीत होत्या. कामक्रीडाहि करीत होत्या. तो तर अजून 'बाळकृष्ण'च होता. आपण पराक्रम केले, याचेंहि त्याला भान नव्हतें. एवढ्यांतच त्याच्या हातून एक नवा पराक्रम झाला, महान पराक्रम. त्या पराक्रमाचें गीत सर्वतोमुखीं झालें.

*गोपी –*

सर्पफणीवर कृष्ण नाचला यमुनेच्या डोहीं
अशी अलौकिक कथा कुणिं कधी ऐकलीच नाही

कालिंदीच्या पात्रीं होता डोह एक गूढ
त्याच्याविषयी भयद वदंता जनिं होत्या रूढ
कालियनामा नाग सकुल त्या जलाशयीं राही १

हलाहलाचा ओघ जणू तो नागरूप झाला
नकळे, कुठल्या दुष्ट हेतुनें व्रजनिकटीं आला
त्याच्या वासें, लाव्हारसनें उसळत्या जळ घेई २

प्रखर विषानें आसमंतहि व्यापियलें होतें
शिळा जळाल्या, जगतें कसलें गवताचें पातें
सजीवतेचा नव्हता उरला वावर त्या ठायीं ३

तीरावरची धरा विषारी, विखारला वारा
अधांतरींही नव्हता तेथे जीवांना थारा
डोहावरुनी उडतां पक्षी, खाक जळून जाई ४

आधी काळें जळ यमुनेचें काजळसें झालें
प्रळयरात्रिचें तमच त्या स्थळीं नीरत्वा आलें
गरलभयानें तिथुन सरकल्या दूर दिशा दाही ५

एकच होता कदंबतरु त्या डोहाच्या काठीं
नीलकंठसा उभा पचवुनी अवघें विष पोटीं



अमृत घेउन सुत विनितेचा स्वर्गाहुन येतां
या वृक्षावर जातां जातां विसावला होता
सहज सांडले होते बिंदू शाखांवर कांही ७

विधिघटनेचें पूर्वसूत्र कां कळतें कोणातें
दिवौकसासम अमरपणा त्या लाभे वृक्षातें
यमुनातीरीं वृक्षराज तो चिरंजीव होई ८

बळिभद्राविण कृष्ण एकटा सवंगड्यासंगें
मुरलीवादन, क्रीडा यांतच वनांतरीं रंगे
निदावसमयीं चुकल्या कोठे वत्सांसह गायी ९

त्या गायी तर तृषार्त होत्या, यमुनेवर गेल्या
काळ्या डोहावरी पोचल्या, तृषार्तची मेल्या
धुंडायास्तव त्यास उडाली गोपांची घाई १०

गायींपाठीं गोपबाळही त्याच स्थळीं गेले
जे गेले ते कृष्णसौंगडी नदीतटीं मेले
पाठीराखा कृष्ण दुरून हें मृत्युसत्र पाही ११

असेल घडलें काय, कशाने ? वासुदेव ताडी
फूत्कारित तो फणा कालिया पाण्यांतुन काढी

कांस घातली पितांबराची, अधर धरी दातीं
दंड थोपटी बालमल्ल तो, थक्क दिशा होती
सवेग चढला कदंबवृक्षीं, जळीं उडी घेई १३

उफाळुनिया उरग धांवला, त्या सादासरशीं
जळांतरीं मग युद्ध जुंपलें अहिचें कृष्णाशीं
सर्वांगासी डसे चिडून तो, हसे शेषशायी १४

कृष्णापाशीं नव्हतें कांही शस्त्रादिक हातीं
वज्रमुष्टिने प्रहार करि तो सर्पाच्या माथीं
फुंफाटे, तो द्विजिव्ह पेटे, कासाविस होई १५

कृष्ण बुडाला, कृष्ण बुडाला व्रजिं वार्ता आली
ऐकतांच तें माय यशोदा मूर्च्छितसी झाली
राम, रोहिणी नंदांच्याही, बळ नुरलें पायीं १६

त्या सर्वांसह नगरच अवघें नदीतटीं ठाके
गळे दाटले, गळती डोळे, साऱ्यांचे शोकें
'कृष्णा कृष्णा' करित आर्तता अद्दष्टां बाही १७

जळपृष्ठावर तरंग उठती, पुनः पुनः विरती
जळांत घ्याया झेप धांवती हरिवेड्या युवती
आवरितां त्या वृद्ध-गोपजन भांबावुन जाई १८

'हे सर्वज्ञा, अनंतरूपा, देवा, जगजेठी
याचसाठि कां पुत्रमिषाने आलासी पोटीं ?'
असें कांहीसें बोलुन पुलिनीं कोसळली आई १९

आणि अचानक जलपृष्ठावर चमत्कार झाला
सूर्यबिंबसें दिसलें श्रीमुख, गोपसखा आला
श्रीचरणातळींचा मंचहि दिसला, सर्पाची डोयी २०

हिमालयीं शिव, तसा नाचला बालकृष्ण माझा
ओवाळाया येति नागिणी गोपांचा राजा
अमृतदर्शन होता उठले, वत्स, गोप, गायी २१

सर्पफणीवर कृष्ण नाचला यमुनेच्या डोहीं
अशी अलौकिक कथा कुणीं कधी ऐकलीच नाही

## २६

*एक प्रौढ व्रजवासी –*

अवतार ईश्वराचा; गोपांत गोप झाला
रसने, रसज्ञते, गा; गोपाल-कृष्ण-लीला

एके दिनीं दुपारीं; ग्रीष्मांतल्या उन्हांत
होतीं गुरें गुराखी; भांडीर-काननांत
लव भान त्या उन्हाचें नव्हतें परी कुणाला. १

सोडून गोधनाते; सारे गडी मिळाले
बलराम कृष्ण दोघे; खेळांत मग्न झाले
शोधीत नीर, चारा; गेलीं गुरें वनाला. २

गेली, पुढें निघालीं; लंघून कोश गेलीं
मुंजाटवींत कोठे; तीं दृष्टिआड झालीं
इकडे अटीतटीच्या खेळास रंग आला. ३

वेगांत धावतांना; पेंद्या पडे उताणा
हसती मुलें विनोदें; हसणें चढे उधाणा
चोळीत नाक पेंद्या; तो कांहिसे म्हणाला. ४

धावून बालकृष्णे; केलें उभें तयाला
'तुज लागलें कुठे का?' सस्नेह प्रश्न केला
पेंद्या म्हणे, 'मुकुंदा रानीं तरू जळाला.' ५

'– रानीं तरू जळाला; तो वास वाहताहे
कोठे तरी सुदूर; वणवा वनांत आहे!
हा खेळ राहूं द्या रे; गाईस हाक घाला.' ६

गंभीर गोप झाले; बघती दिशांस दाही
ओसाड आसमंत; चिटपाखरूंहि नाहीं
आनंद खेळण्याचा; चिंतानलास भ्याला. ७



मातीवरी अफूट; होते ठसे खुरांचे
शोधीत गोप गेले; मग माग ते गुरांचे
क्रोशार्ध लोटला तो, आक्रोश ऐकूं आला. ८

धांवे कुणी पुढारा; नच चालवे कुणाला
दृष्टीपथांत आल्या; आरक्त अग्निज्वाला
वणवा वनास वेढी; हा, हाय, घात झाला. ९


‘ कपिले, तिले, हिमांगी ’; – श्रीकृष्ण हाक मारी
प्रतिसाद धेनुकांचे, उठले दिशांत चारी
तो लाल लोळ आले, गिळण्यास गोपबालां. १०

‘ ही हंबरे कुणाची ?; तें वासरूं कुणाचें ! ’
‘ कानां न साहती हे; आक्रोश पाखरांचें ’
‘ तूं देव बाळकृष्णा; या वार संकटाला ’. ११

बोले मुकुंद तेव्हा; ‘ डोळे क्षणैक झाका ’
होऊं नका अधीर; मारूं नकाच हाका ’
आज्ञा हवीच होती; भक्तास पालनाला. १२

डोळे मिटून थांबे; जागींच गोपवृंद
उघडी हळू मुखाते; घननीळ श्रीमुकुंद
प्रलयाग्नि तो स्वयें त्या; कमलाननांत आला. १३

विषदुग्ध पूतनेचें; विषडंख कालियाचें
पूर्वी सुखेन प्यालें; हें बाळ गोवळ्याचें
दावाग्नि कां न व्हावा; नैवेद्य आज त्याला ! १४




२७ एकदा म्हणे, श्रीकृष्णाने कुणा तरुण गोपिकांचीं वस्त्रें पळविलीं. एका वृक्षावर जाऊन, तीं आपणापाशीं ठेवलीं. गोपींच्या ध्यानीं ती गोष्ट आली मात्र, कृष्णाच्या लीला-नाटकांत त्याहि सहभागी झाल्या.

गोपकिशोरी –

परत दे, वस्त्रें गोपाळा !
नीर नेसलों, नभ पांघरलों, आम्ही व्रजबाळा

ठेऊन तटाकीं काचोळ्या नेसणीं
निःशंक डुंबतों आम्ही साऱ्याजणी
कळविली मात ही कृष्णा, तुजसी कुणी ?
अकस्मात् तूं येउन केलिस वसनें तीं गोळा १

भर मार्गशीर्ष हा, हींव दाटलें अती
जलवीचि शरीरां शरांपरी झोंबती
कोंवळ्या गोपिका थरथरती कापती
अशाच वेळीं सुचला तुजसी हा अवखळ चाळा २

आकंठ लपवुनी अंगें उदकांतरीं
विनविती बालिका तुजसी या श्रीहरी
एकदा दया या दीनांवरती करी
हात जोडितां, होते उघडी लज्जा घननीळा ३

बोलसी काय तूं वसुनी शाखेवरी ?
'जळ नितळ नदीचें केवळ काचेपरी'
होईल कुणी ना वचनें या घाबरी
शुद्ध आमुचीं मनें, देह, पट, वरचा पाचोळा ४

नेलीस चिरगुटें व्यर्थच तूं, मोहना
नवनीत-चोर तूं, लूट आमच्या मनां
आम्हीच अधिरलों, नाथा, तव मीलनां
आभाळाविण कोण आपणिल ताऱ्यांचा मेळा ? ५





*कालियामर्दनाच्या प्रसंगानंतर श्रीकृष्णाचें अलौकिकत्व गोकुळांतील साऱ्याच जनतेला पटून गेलें. त्याच्या 'लीलां'चीं गाणीं लहानथोरांच्या तोंडीं झालीं. कंसाने पाठविलेल्या अघ-बकादि असुरांचा तर श्रीकृष्णाने संहार केलाच, पण प्रत्यक्ष देवेंद्राच्या शक्तीलाहि त्याने आव्हान दिलें. गोकुळांत नित्य साजरा होणारा इंद्रयाग श्रीकृष्णाने होऊं दिला नाही. देवेंद्राचा कोप झाला. मेघ आणि मरूद्गण यांच्याकडून त्याने गोकुळावर घोर पर्जन्यवृष्टि कराविली आणि –*

*गोपगोपिका ( समूह-गीत ) –*

प्रळयघन दाटलें चहुदिशीं अंबरीं
जलनिधी पालथे होति जणु भूवरीं

नाचती, गर्जती वात विद्युल्लता
मांडिती तांडवा नाचतां नाचतां
धुवुन काढावया चित्रसी व्रजपुरी

वृद्ध जे वृक्ष ते कडकडा मोडती
तरुण त्या तरुलता हस्तपद झाडती
सावरी कोण त्या ? जळच खाली, वरी

बुडुन गेले नदी, ताल तैसीं तळीं
अन्नधन रानचें, बुडुन गेलें जळीं
भिउन आक्रोशतीं माणसें घाबरीं

ओढ घेते गुरुं, फास लागे गळा
गोप कुणि धांवती येउनी कळवळा
उघडितां द्वार ये पूर गृहभीतरीं

कोसळे भिंत वा खांब खाली पडे
सापडेना शिशु, चीजवस्तू बुडे
कोसळे तो तडित्, कडकडत छप्परीं

'धांव मधुसूदना, वांचवी वांचवी'
याविना गोकुळिं बोल ना मानवी
'आसुरी बल न हे, देव झाला अरी'

ऐकुनी आर्त ही आप्त-जन-प्रार्थना
नंदसुत श्रीहरी निरखि गोवर्धना
'मागुती या', अशी त्वरित आज्ञा करी

भिजत जन चालले, गोप, गोपी, मुलें
घेउनी संगतीं सजिव धन आपुलें
धांवुनी, पोहुनी गाठती तो गिरी

गिरितळीं श्रीहरी ठाकला क्षण उभा
नेटकें बोलला न्याहळूनी नभा
पाहुं, सुरशासका, धांव तव कुठवरी ?

निमिष ना संपलें, हरि जरा हालला
अंगुली लावुनी अचल तो उचलिला
वायु कां श्वासही थांबले पळभरीं

छत्रसा तो गिरी जाहला आसरा
शरण देवेंद्र ये कोवळ्या लेकुरां
जनशिरीं गिरि धरी, मुरलिधर श्रीहरि



२९ *गोवर्धनोद्धरणानंतर गोकुलवासियांनी श्रीकृष्णाला परमात्माच मानला. त्या परपुरुषाच्या क्रीडेंत साऱ्या गोपी समभागी होऊं लागल्या. त्यांना श्रीकृष्णाचें वेडच लागलें. श्रीकृष्णाच्या मुरलीचें मग काय सांगावें ?*

*राधा –*

शरदामधल्या संध्याकाळीं
शांती नांदे उभ्या गोकुळीं
निळया नभाच्या भाळावरती, पूर्ण चंद्र साजतो,
पावा वनिं वाजतो.

मधुर मनोहर तो मुरलीरव
भुलवी यौवन, फुलवी शैशव
युवती युवती व्हावी हरिरत, मंत्र असा योजतो.

दो गुडघ्यांवर चरवी घेउन
कुणी गोपिका करि गो-दोहन
सूर ऐकतां, एकाएकी हात तिचा थांबतो.

पात्र रितें की भरलें पुरतें
तिचें तिला ना दिसतें, स्मरतें
देहाआधी श्रीहरिजवळीं जीव-भाव पोचतो.

विसरून वत्सां, उठती प्रौढा
पतीस त्यजिती, मुली नवोढा
परपुरुषाचा साद तयांना दुरुनी आकर्षितो.

निज भर्त्यांची शेज सोडुनि
'कृष्णा कृष्णा' म्हणति कामिनी
वसनांचें ना भान, मनांना कृष्णसखा बाहतो.

सोडुनिया घर साऱ्या निघती
निघती त्या ना मागे बघती
त्या वेड्यांचे वेष पाहुनी वारा मनीं लाजतो.

कालिंदीच्या काठीं फुलली
योजनगंधा कलिका मुरली
त्या गंधाच्या अनुरोधाने संघ पुढे चालतो.

हरिमीलन हा एकच निश्चय
नुरली लज्जा, ना नीती-भय
कुरकुर करती नूपुर कंकण, कोण तयां ऐकतो ?

साध्य एक पण अगणित वाटा
जिला तिला हरि हवा एकटा
उरला सुरला विरहकाल जणु तनां मनां भाजतो.



३० *श्रीकृष्णाच्या मुरलीगीताने वेडावून, देहभान विसरलेल्या गोपी, यमुनेकांठच्या वनांत त्याच्याभोवतीं जमा झाल्या. प्रत्येक गोपीच्या डोळयांत आत्मार्पणाचा भाव भरून ओसंडत होता. तो भाव पाहून स्वत: श्रीकृष्णच त्यांना म्हणतो :*

*श्रीकृष्ण –*

**आलांत कशाला येथे, अपरात्रीं यमुनातीरीं ?**
**गोकुळिंच्या गौळणिनो, जा, आपुल्या घरीं, माघारीं**

**धांवतां लागल्या धापा, थरथरती अजुनी ऊर**
**साऱ्याच अशा कां आलां, काननांत इतक्या दूर ?**
**मायावी रात्रिंचर कां, गोकुळास फिरुनी घेरी !**

**बोलतां न कोणी कांही, नयनांत दिसे ना भीती**
**अंतरिंचे हेतु तुमच्या जाणावे कोण्या रीती ?**
**केलेंत साहस कैसें, शिरलांत कशा कांतारीं ?**

विसरल्या कंचुकी ल्याया दिसतात गोपिका कोणी,
कां विकच्छ दिसती कोणी ? मोकळी कुणाची वेणी;
निसटल्या निर्‍यांसह आल्या, लज्जावती विनयी नारी ?

पांघरावयाचीं वसनें, कित्येक गौळणी ल्याल्या
शालीसम दिसती साड्या, अंगांवर पांघरलेल्या
मेखला घातल्या कंठीं, वेढिल्या कटी मणिहारीं

अर्धाच रेखुन डोळा, ही एक धांवली वेडी
अंजनांत रंगविलेली, हातींच तियेच्या काडी
तांबूल माळिले माथीं, सुमनेंच मुखा-माझारीं

आसक्ती भरली चित्तीं, आसक्ती दिसते गात्रीं
विषयांध होउनी तुम्ही, धांवलांत इतक्या रात्रीं
तेजांत चराचर न्हातें, तुम्हीच उभ्या अंधारीं

माय, बाप, बंधू तुमचे, लेकरें, पती वा आप्त
असतिल घरोघर झाले, चिंतेने तुमच्या व्याप्त
तुम्ही तर त्यांच्या कन्या, भगिनी वा माता, दारा

सांगतो कृष्ण तुम्हांसी, गोपींनो, ध्यानीं ठेवा
धर्मकार्य स्त्रीजातीसी, आपुल्या पतीची सेवा
कल्याण आप्त-बंधूंचें, पाळणें प्रजा संसारीं



३१ 'घरीं परत जा' हा कृष्णाचा उपदेश ऐकून सर्व गोपी क्षणकाल चमकल्या. दुःखी झाल्या. नंतर मात्र माझ्याच मुखाने त्यांनी कृष्णाला उत्तर दिले :

राधा –

आदि पुरुष तूंच, तुला जाणिले हरी
तुजसि त्यजुन जाउं कुठे, कोणत्या घरीं ?

योगीजन मोक्षकाम;
पावति या पदिं विराम
आर्त कामिनींस कसा, दवडिसी दुरी ?

सांगु नको सद्विचार
एक करी – अंगिकार !
हृदयांतिल जाण भाव, भाव आवरी

तृषितासी सांगे जळ,
कूप खोद, घेइ कुदळ
हास्यास्पद तेवि तझें वच खरोखरी

सोडुनि सुख, प्रापंचिक
सोडुनि पति-पुत्रादिक
उन्मनस्क आलों, तव श्रवुनि बासरी

आम्ही करूं आत्मार्पण
'हो' अथवा 'नाही' म्हण
जन्म, मरण, मुक्तिदान, सकल तव करीं

मन, बुद्धी, तनु कणकण
तुजसि करी आमंत्रण
अहंकार मात्र विरून जाय अंतरीं

श्याम निळा, गगन निळें
आम्हीहि निळया आत्मबळें
नीळ जळें यमुनेचीं उडतीं अंबरीं

व्रजललना, गोपिनाथ
एकरूप त्या निळ्यांत
निळ्यांत न्हावुनी निघो, नील नील शर्वरी

ना जाणों असति कशा
वैराग्यापार दशा ?
आम्ही तर बुडुन जाउं, सुखसरोवरीं





*गोपीचा प्रेमभाव हा शुद्ध भक्तीचाच आविष्कार आहे हें त्या परमात्म्याने जाणलें. त्यांच्या भावनांचा परमादर केला. कालिंदीच्या वाळवंटांत रासनृत्यें रंगूं लागलीं. एकदा काय झालें ...*

*राधा –*

शिवप्रभेसम पडे चांदणें यमुनापुलिनावरी
गोपीसंगे खेळ खेळतो लीलानट श्रीहरी

गगनिं चंद्रमा, लक्ष तारका
तळिं पुरुषोत्तम, अमित गोपिका
मंच सुशीतल मृदुल वालुका
वाजति नुपुर, कंकण, कांची वाजे मधु बासरी १

कृष्ण डोलतो, डोलति ललना
पवन नाचवी जललहरींना
रातवल्लरी फुलल्या नाना
आसमंत हो सर्व सुगंधित, रासाच्या अवसरीं २

विश्व विसरल्या गोपकामिनी
विश्वनाथ मनिं, भरला नयनीं
अधिर धांवती बाहू पसरुनी
परंज्योतिवर झेप घालिती लुब्ध पतंगांपरी ३

मुरलि न उरली हरिच्या अधरीं
सुख तें लुटिती झटुन सुंदरी
कुणी करांगुलि धरी निजकरीं
वैजयंतिसम अलकभार कुणि रुळवी वक्षावरीं ४

पदयुगुलें कुणि धरी मस्तकीं
कुणी त्यागिनी वसन; कंचुकी
अवघ्या लाविती जन्म सार्थकीं
जीव जीव जणु सर्वस्वातें शिवापुढे अंथरी ५

बाहु प्रसारण, दृढ आलिंगन
प्रदीर्घ चुंबन, उरोजमर्दन
अनिर्बंध मग मन्मथनर्तन
आर्त, मुमुक्षु, चढत चालल्या मोक्षाची पायरी ६

अंतीं उरला प्रकाश केवळ
एक अनामिक सुगंध निर्मळ
नुरली यमुना, वाळू, कातळ
नाद अनाहत घुमत राहिला तेजोमय अंबरीं



३३ गोपालकृष्णाचें लीलाचरित्र इकडे असें भरास आलें होतें. साऱ्या व्रजवासियांची मनोमन खात्री पटली होती की, श्रीकृष्ण हा प्रत्यक्ष परमात्मा आहे; आपलें महद्भाग्य म्हणून तो आपल्यांत वावरतो आहे.

इकडे मथुरेंत भोजपती कंसाच्या प्रासादांत एकाएकी देवर्षि नारदांचें आगमन झालें. कंसाने त्यांचें यथोचित स्वागत केलें. नारदांनीहि त्याला तोंडभर आशीर्वाद दिला. ते म्हणाले :

देवर्षि नारद –

विजय असो तव सदैव कंसा, सुखी रहा तूं, तुझे प्रजाजन,
श्रीनारायण, जय नारायण,

आप्त मानिसी मजसी नृपा तूं,
तुझें कुशल हा माझा हेतू,
उभयांतिल हा अतूट तंतू
तुझ्याकडे मज ओढून आणी,
आज अचानक तें आकर्षण १

भृत्य, दासिजनि नकोत भवतीं

लक्ष देऊनी ऐक नरपती
शिरीं लटकतें शस्त्र ठेवुनी,
अससी कैसा तूं निद्राधिन २

जन्मांतरिंची ऐक आठवण
पुनर्जात तूं दैत्य पुरातन
तुझ्या वधास्तव झटती सुरगण
अजुन न सिद्धी तयां लाभली,
अजुन न सरलें वैर सनातन ३


अनंत जन्मांतरिंचा वैरी
तुझ्या भगिनिच्या येउन उदरीं
वाढत आहे व्रजीं श्रीहरी
ठावठिकाणा तुला न ठावा,
गर्व शक्तिचा धरिसि अकारण ४

शोधास्तव जे व्रजांत गेले
दूत तुझे ते अवघे मेले
त्यानंतर तूं काय योजिलें ?
निर्भय चित्तें कसा राहसी ?
मरण स्वतःचें समोर पाहुन ५

सुत नंदाचा नव्हे श्रीहरी
भागिनेय तो तुझाच, वैरी
जन्म पावला देवकि-उदरीं
वसुदेवानें स्वयें ठेविला,
नंदघरीं तो तुजसी चकवुन ६

काय वधुनिया वसुदेवाते ?
संहारक तें, पुरें वाढतें
अवघ्या शक्ती लाव पणाते
बद्ध करुनिया आण पदांसी,
गोपपुत्र ते हरिसंकर्षण ७

समय साधुनी दिली सूचना
इत्युत्तरिं तूं, तुझ्या कल्पना
मला न कांही साध्य, साधना
ऋत-सत्यातें स्पष्ट बोललों,
म्हणो कुणी मज कलहपरायण ८



३४ नारदांच्या सूचनेप्रमाणे कंसाने अक्रूर नांवाच्या सामंताला नंदाकडे धाडलें. भोजराज कंसाचें निमंत्रण स्वीकारून श्रीकृष्ण व बलराम मथुरेकडे जायला निघाले. गोपींना गहिंवर आवरेना. त्या रथाला आडव्या झाल्या, रडूं लागल्या. "कृष्णा, दामोदरा, नको रे आम्हांला सोडून जाऊंस" असें पुनः पुन्हा विनवूं लागल्या. तेव्हा श्रीकृष्ण उठून उभा राहिला. गद्‌गद स्वराने म्हणाला :

श्रीकृष्ण –

सख्यांनो, मथुरेसी जातो
दानपती हा अक्रुर आम्हां सन्मानें नेतो

रोधुं नका रथ तुमच्या रुदनें
व्रजललनांनो, पुसा लोचनें
निरोप द्या मज, सुहास्य वदनें
नका आडव्या पडूं पथावर, पद तुमचे शिवतो १

आकाशांतुन अवतरतें जळ
गिरीशिरीं तें ठरे न निश्चळ
नकळत त्याचा होतो ओहळ
वाहत जाणें धर्म जळाचा, ओघ गती घेतो २

अटळ वाहणें, अटळ वाढणें
फुलवित जीवन विशाल होणें
विसरुन अवखळ झुळझुळ गाणें
या ओघांतुन महानदाचा उगम पुढे होतो ३

विसरा शिशुपण, नृत्यें, क्रीडा
मनीं जपा ग भाव तेवढा
जाऊं देत मज, हेका सोडा
आवाहन मज करी पराक्रम, प्रतिसादा देतों ४

खेळ संपले यमुनातटिंचे
वाळवंटिंचे; अटीतटीचे
येइ निमंत्रण उठाउठीचें
आज माझिया पुरुषार्थासी शुभारंभ होतो ५

ही सांभाळा मोहन-मुरली
हिची आमुची संगत सरली
आकांक्षा नव हृदयीं भरली
तिच्या पूर्ततेसाठी, तुमचे आशिर्वच घेतों ६

वियोग नच हा, विकास-घटिका
क्षणिक शोक कां करितां घटका
आभासांचीं पटलें झटका
बघा समोरीं बाल मरीची चंडरूप घेतो ७

प्रणाम ताता, माय यशोदे
ये पेंद्या, मज आलिंगन दे
मान करी वर – येतो राधे
आबालक जन गोकुलवासी अवघे मी नमितो ८

गाई, वत्सें, यमुना काळी
नमन कदंबा, या शुभ वेळीं
धूळ येथली धरितो भाळीं
चला अक्रुरा, हय हांकारा, व्यर्थ उशिर होतो ९

## ३५

*अक्रूराच्या रथांतून श्रीकृष्ण मथुरेला गेला तो गेलाच. त्याच्या आयुष्याचा दैदीप्यमान ग्रंथ तिकडे उलगडत राहिला. गोकुळापासून दूर. प्रेमवेडी राधा त्याच कालिंदीच्या काठीं बसत राहिली. कधी कधी काकुळतीला येऊन ती म्हणे :*

*राधा –*

माझ्यासाठीं तरी एकदा
गोकुळिं येउन जाइ मुकुंदा

तुझ्याविना हरि, उदास व्याकुळ
चिखलमातिचें झालें गोकुळ
कळसूत्रांकित पुतळ्या केवळ
अशा नांदति ललना, प्रमदा १

पथिं मथुरेच्या रथ तव गेला
गेला तो ना मजसी दिसला
वियोगिनीच्या उभय लोचनीं
जलधारांचा होता पडदा २

यदुकुलवीरा, कुलावतंसा
निवटिलेस तूं कपटी कंसा
ऐकियली मी वार्ता कानीं
शिवूं न शकलें तुझ्या शुभपदा ३



अकंपातवनिं, क्षीप्रेनिकटीं
नांदलास तूं विद्येसाठी
तिथे कसे ना आठवलें तुज
इथले मधुवन, इथली राधा ४

तव चरिताचा ग्रंथ माधवा
श्रुतीं होउनी येतो गावा
तो ऐकत मी व्यथा विसरतें
तुझें सुयश ती मला संपदा ५

वर्षें कां रे ? युगें लोटलीं
राधामाधव मुळि न भेटलीं
विरहवनाच्या श्यामलगगनीं
रूप दिसूं दे तुझें, अंबुदा ६

पाजिलेंस तूं अमृत पार्था
एक अश्रू दे मजला आर्ता
एकवार दे दृढालिंगना
तीच घटी मज ठरो मोक्षदा ७

तोंवरि हरि मी जगतीं राहिन
तुझें बालपण गीतीं गाइन
तव पुरुषार्था पुजित राहिन
आठवीन तुज लाखलाखदा ८

[समास]

REFBK-0023484
REFBK-0023484
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

